MHKO100011032022

**नियमीत दिवाणी दावा क्र. २४८/२०२२**

भिमाप्पा व्हनुरी (जंगली) वगैरे.
//वि//
हौसाबाई जंगली वगैरे.

**निशाणी क्र. २४ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १, २, ४, ६, ८, १०, १३ ते १५ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दि. २०/०३/२०२३ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. २३/०३/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, प्रस्तुत प्रतिवादी यांना दावा मिळकतीची महसूल कार्यालयातील आवश्यक कागदपत्रे व नक्कला वेळेत उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच, त्यांना दावेचे कामी मुदतीत कैफियत दयावी लागते याचे कायदेशिर ज्ञान नव्हते. त्यामुळे, प्रतिवादी यांना वादीचे दावेस कैफियत व म्हणणे मुदतीत सादर करता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्याने

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १, २, ४, ६, ८, १०, १३ ते १५ यांना प्रत्येकी रक्कम रु.१००/- अशी एकूण रक्कम रु.९००/- च्या खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.९००/- (रुपये नऊशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १, २, ४, ६, ८, १०, १३ ते १५ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सही/-

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०९/०१/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 09/01/2024 |
| Order signed by P.O. on | 09/01/2024 |
| Order uploaded on | 09/01/2024 |